पुढारी

# के. के. वाघ अभियांत्रिकीच्या १८९ विद्यार्थ्यांना नोकरी

**आडगाव : पुढारी वृत्तसेवा**

के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलमार्फत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील कॉम्प्युटर, आयटी, कॉम्प्युटर सायन्स, डिझाईन आणि आर्टिफिशिअल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स या विभागातील विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस ड्राइव्हचे आयोजन करण्यात आले. यामध्ये सुमारे ५० हून अधिक नामांकित मल्टिनॅशनल उद्योगसमूहांनी सहभाग घेतला. यात १८९ विद्यार्थ्यांना नोकरीची सुवर्णसंधी मिळाली.

नोकरी मिळालेल्या विद्यार्थ्यांना सरासरी ४.८० लाख रुपयांचे वार्षिक पॅकेज प्राप्त झालेले आहे. १८९ विद्यार्थ्यांपैकी ७३ मुली व ११६ मुले आहेत. या उद्योगसमूहांमध्ये नेटविन्स, टीसीएस आणि जोश सॉफ्टवेअर यासारख्या कंपन्यांचा समावेश आहे. तसेच फिनक्यू, जोश सॉफ्टवेअर, इन्फोसिस, आयबीएम, टेक महिंद्रा, एचएसबीसी, केपीआयटी, विंजित आणि एनसीडीईएक्स यांसारख्या अनेक कंपन्यांचा समावेश असल्याची माहिती ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी दिली.



**आडगाव : के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलमार्फत निवडले गेलेले विद्यार्थी.**

महाविद्यालयातील आठ विद्यार्थ्यांना दुबई येथील अलाईड कॅंट्रॅक्टिंग व फाइव्ह होल्डिंग्स या नामांकित कंपनीमध्ये एक महिन्याची इंटर्नशिपची संधी मिळाली. संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ आणि प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

Nashik Edition
Jun 12, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com